# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
## दिव्यांग विभाग
## जाहिर सुचना/प्रसिध्दी

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपलिकेच्या दिव्यांग विभागांतर्गत महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दिव्यांग लाभार्थी यांना उदरनिर्वाह भत्ता आदा करणेकामी भत्ता मागणी अर्ज व हयातीचा दाखला देणे सुलभ होणेकामी महानगरपालिकेच्या वेबसाईट वर ऑनलाईन पोर्टल सुविधा उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

सदर ऑनलाईन सुविधा सुलभपणे कार्यान्वीत होणेसाठी - **"दिव्यांग व्यक्तीसाठी एकदाच नोंदणी"** करणे आवश्यक आहे. सबब, दिव्यांग व्यक्तींच्या नोंदणी कामी खालील कागदपत्रे आवश्यक आहेत.

१. UDID कार्ड व प्रमाणपत्र आवश्यक आहे. सदर UDID कार्डवर मुदत कालावधी/वैधता दिनांक अद्यावत असणे बंधनकारक आहे.

२. दिव्यांग लाभार्थी व्यक्ती हा ४० % व ४० % पेक्षा जास्त दिव्यांगत्व असणारा दिव्यांग लाभार्थी असावा.

३. दिव्यांग व्यक्तीचा आयडेंटी साईज फोटो

४. उत्पन्नाचा दाखला

५. आधार कार्ड (महानगरपालिका कार्यक्षेत्र)

६. रेशन कार्ड

७. मतदान ओळखपत्र (असलेस)

८. बँक पासबुक (अद्यावत)

उपरोक्त प्रमाणे दिव्यांग व्यक्तीने/पालकांनी **खाली दिलेल्या किंवा महानगरपालिकेच्या वेबसाईवर जाऊन दि. १ मे २०२६ ते ३१ ऑगस्ट २०२६ अखेर एकदाच नोंदणी करावी व सर्व मुळ कागदपत्रे सदर पोर्टल वर अपलोड करावी व दिव्यांग व्यक्तीचा नोंदणी क्रमांक स्वत:जवळ ठेवावा.**

लिंक - https://smkc.gov.in:८४४३/disability-registration

मा.आयुक्तसो यांचे मान्यतेने

(अश्विनी पाटील)
**उपायुक्त (मुख्यालय)**
सांगली मिरज आणि कुपवाड
शहर महानगरपालिका